



दैनिक

अचूक वेध,अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

**वर्ष : ०४**, अंक : १००
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, शुक्रवार, दि.२२ नोव्हेंबर २०२४

## निकालाआधीच महायुतीत मुख्यमंत्रिपदावरून रस्सीखेच

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२१, मुंबई :** महाराष्ट्र विधानसभेसाठी बुधवारी (२० नोव्हेंबर) मतदान पार पडलं. आता शनिवारी (२३ नोव्हेंबर) या निवडणुकीचा निकाल जाहीर केला जाईल. महाराष्ट्रासह देशभरातील लोकांचं या निकालाकडे लक्ष लागलं आहे. तत्पूर्वी निवडणूक निकालाचे एक्झिट पोलदेखील समोर आले आहेत.



या पोल्सनुसार महायुतीचं पारडं जड दिसत आहे. मात्र, २०१९ च्या निवडणुकीत जवळपास सर्वच एक्झिट पोल चुकीचे ठरले होते. त्यामुळे यंदा काय निकाल लागतो याबाबत लोकांची उत्सुकता वाढली आहे. दरम्यान, महायुतीमधील सर्वच नेत्यांनी दावा केला आहे की राज्यात आम्हालाच बहुमत मिळेल आणि आम्ही लवकरच राज्यात सरकार स्थापन करू. मात्र, राज्यात महायुतीचं सरकार आल्यास मुख्यमंत्री कोण होणार हा प्रश्न उपस्थित केला जात आहे? त्यावर महायुतीमधील नेत्यांनी वेगवेगळ्या नेत्यांची नावं घेतली आहेत. त्यामुळे निवडणुकीच्या निकालाआधीच महायुतीत मुख्यमंत्रिपदावरून रस्सीखेच चालू आहे का? अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे.

भारतीय जनता पार्टीचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी काही वेळापूर्वी प्रसारमाध्यमांशी बातचीत केली. यावेळी त्यांना विचारण्यात आलं की महायुतीची सत्ता आल्यास मुख्यमंत्रीपदाची शपथ कोण घेईल? भाजपा कार्यकर्त्यांची इच्छा आहे की देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्रीपदाचा चेहरा असावेत. यावर बावनकुळे म्हणाले, भाजपा कार्यकर्त्यांना १०० टक्के वाटतं की आमचा नेताच मुख्यमंत्री व्हायला हवा. देवेंद्र फडणवीस मुख्यमत्री व्हावेत असं सर्वांनाच वाटतं. त्याचप्रमाणे शिवसेनेला (शिंदे) वाटतं की एकनाथ शिंदे मुख्यमंत्री व्हायला हवेत. तर राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार) कार्यकर्त्यांना वाटतं की अजित पवार मुख्यमंत्री व्हायला हवेत. अखेर मुख्यमंत्रीपदाबाबत केंद्रीय नेतृत्व व राज्यातील हे तीन प्रमुख नेते (एकनाथ शिदे, देवेंद्र फडणवीस, अजित पवार) बसून चर्चा करतील आणि निर्णय घेतील.

**बावनकुळेंच्या वक्तव्यावर शिवसेनेची (शिंदे) प्रतिक्रिया**

दरम्यान, बावनकुळे यांच्या वक्तव्यावर आता शिवसेनेकडून (शिंदे) प्रतिक्रिया आली आहे. शिवसेनेचे आमदार व प्रवक्ते संजय शिरसाट म्हणाले, भाजपाचा नेता मुख्यमंत्री व्हावा असं बावनकुळे यांना वाटणं स्वाभाविक आहे. त्याचप्रमाणे आम्हालाही वाटतं की आमचा नेता मुख्यमंत्री व्हायला हवा. परंतु, आम्ही महायुती म्हणून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली या निवडणुकीला सामोरे गेलो.

आम्ही एकनाथ शिंदे यांचा चेहरा घेऊन निवडणूक लढलो. राज्यातील जनतेने एकनाथ शिंदे यांच्या चेहऱ्याला पसंती दर्शवली आहे. त्यामुळे आम्हाला वाटतं की मुख्यमंत्रीपदावर एकनाथ शिंदे यांचा हक्क आहे. निकालानंतर तेच राज्याचे मुख्यमंत्री होतील अशी आम्हाला खात्री आहे. आम्हाला मनापासून वाटतं तेच मुख्यमंत्री व्हावेत आणि तेच होतील याची आम्हाला खात्री आहे.

## जिल्ह्यातील ७ लक्ष ८४ हजार ५५५ मतदारांनी बजावला मतदानाचा हक्क

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२१, वर्धा :** जिल्ह्यातील चारही विधानसभा निवडणुकीकरीता दि.२० नोंव्हेंबर २०२४ रोजी सकाळी ७ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत मतदान घेण्यात आले. मतदारानी उत्स्फुर्तपणे मतदान केल्यामुळे जिल्ह्यातील चारही विधानसभा मतदार संघातील एकुण ११ लाख ३२ हजार ३२६ मतदारांपैकी ७ लक्ष ८४ हजार ५५५ मतदारांनी आपल्या मतदानाचा हक्क बजावला.

या मतदानाची एकुण टक्केवारी ६९.२९ टक्के आहे. या निवडणुकीत जिल्ह्यात विक्रमी मतदान झाले असुन प्रशासनाने स्वीपच्या माध्यमातुन मोठ्या प्रमाणात मतदार जागृती केल्यामुळे मतदानाचा टक्का वाढला आहे.यावेळी मतदारांमध्ये उत्साह दिसून आला. काही मतदान केंद्रांवर महिला व युवा मतदारांनी उत्स्फुर्तपणे मतदान केले. यात नवमतदार, महिला, दिव्यांग मतदार व जेष्ठ नागरिकांचा समावेश होता. प्रशासनाच्यावतीने मतदान केंद्रावर सोई सुविधा पुरविण्यात आल्या होत्या. शांततामय वातावरणात पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत सायंकाळी ६ वाजेपर्यंत ६९.२९ टक्के मतदान झाले. आर्वी ७१.८६ टक्के, देवळी ६८.९६ टक्के, हिंगणघाट ७०.८७ टक्के, वर्धा विधानसभा मतदार संघात ६५.६८ टक्के मतदान झाले.

आर्वी मतदार संघात एकुण २ लाख ६५ हजार ४२० मतदार असून यामध्ये १ लाख ३३ हजार ५९८ पुरूष तर १ लाख ३१ हजार ८२० महिला असून २ इतर मतदारांचा समावेश आहे. यापैकी ९९ हजार ८२१ पुरुष मतदारांनी (७४.७२ टक्के), ९० हजार ९१० स्त्री (६८.९७ टक्के)मतदारांनी तर २ इतर (१०० टक्के) मतदारांनी असे १ लक्ष ९० हजार ७३३ (७१.८६ टक्के) मतदारांनी मतदान केले. देवळी मतदार संघात एकुण मतदार २ लाख ७४ हजार ६०८ मतदार असून यामध्ये १ लाख ३८ हजार ५३८ पुरूष तर १ लाख ३६ हजार ७० महिला आहे. यापैकी ९८ हजार ८४९ पुरुष मतदारांनी (७१.३५ टक्के), ९० हजार ५१४ स्त्री मतदारांनी (६६.५२ टक्के) असे १ लक्ष ८९ हजार ३६३ (६८.९६ टक्के) मतदारांनी मतदान केले. हिंगणघाट मतदार संघात एकुण मतदार २ लाख ९७ हजार ५४७ मतदार असून यामध्ये १ लाख ५१ हजार ५३८ पुरूष तर १ लाख ४६ हजार ९ महिला आहे. यापैकी १ लक्ष ११ हजार ४१६ पुरुष मतदारांनी (७३.५२ टक्के), ९९ हजार ४५८ स्त्री मतदारांनी (६८.१२ टक्के) असे २ लक्ष १२ हजार ८७४ (७०.८७ टक्के) मतदारांनी मतदान केले.वर्धा मतदार संघात एकुण मतदार २ लाख ९४ हजार ७५१ मतदार असून यामध्ये १ लाख ४७ हजार ४११ पुरूष तर १ लाख ४७ हजार ३२९ महिला असुन ११ इतर मतदार आहे. यापैकी ९९ हजार २४० पुरुष मतदारांनी (६७.२२ टक्के), ९४ हजार ३३७ स्त्री मतदारांनी (६४.०३ टक्के) तर इतर ८ मतरांनी (७२.७३ टक्के) असे १ लक्ष ९३ हजार ५८५ (६५.६८ टक्के) मतदारांनी मतदान केले.वर्धा जिल्हयातील आर्वी, देवळी, हिंगणघाट व वर्धा या चारही विधानसभा मतदारसंघात शांततेत मतदानाला सुरुवात झाली. मतदान केंद्रांवर सकाळी सात वाजतापासूनच मतदारांनी हजेरी लावली होती. ठिक-ठिकाणी मतदारांच्या लांबच लांब रांगा दिसल्या. दिव्यांग व वरिष्ठ मतदारांना सुलभपणे मतदान करता यावे, यासाठी जिल्हा प्रशासनाच्या वतीने विशेष व्यवस्था करण्यात आली होती.जनजागृतीमुळे मतदानाच्या टक्क्यात वाढ- राहुल कर्डिलेमतदार जागृती (स्वीप) अंतर्गत जिल्ह्यातील प्रत्येक विधानसभा मतदार संघात वैविध्यपूर्ण कार्यक्रम राबविण्यात आले. या माध्यमातून मतदारांपर्यंत मतदान करण्याचा संदेश नागरिकांपर्यंत पोहचविण्यात आला. रांगोळी, विविध स्पर्धा, बाईक रॅली, मतदार जनजागृती चित्ररथ, विद्यार्थ्यांचे आई वडिलांना पत्र, विविध शिक्के, पथनाट्य, सिने व नाट्य क्षेत्रातील कलावंत यांचे मतदानाचे आवाहन व्हिडीओ, होर्डिंग, स्टँडी, दीपोत्सव आदी माध्यमाद्वारे जनजागृती करण्यात आल्याने नागरिकांना मतदानाचे महत्व पटवून दिल्यामुळे मतदानाचा टक्का वाढला. असे जिल्हाधिकारी यांनी सांगितले.

## मुंबई उपनगरातील किमान तापमान १९ अंशाखाली

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२१,मुंबई :** या आठवड्यात उपनगरातील किमान तापमानातील घट कायम असून, गुरुवारी सांताक्रूझ केंद्रात किमान तापमान १९ अंशाखाली नोंदले गेले. तेथे १८.५ अंश सेल्सिअस किमान तापमानाची नोंद झाली. उत्तरेतील थंड वाऱ्यामुळे राज्यातील विशेषत: उत्तर महाराष्ट्राच्या किमान तापमानात घट होत आहे. मुंबईत उपनगरात किमान तापमान आठवड्याच्या सुरुवातीस २० अंशाखाली घसरले. मागील तान – चार दिवसांपूर्वी ते १९ अंशापर्यंत पोहोचले, गुरुवारी त्यामध्ये आणखी घट होऊन सांताक्रूझ केंद्रावर १८.५ अंश सेल्सिअस किमान तापमान नोंदले गेले. नोव्हेंबर महिन्यात प्रथमच किमान तापमान १९ अंशाखाली गेले आहे. पुढील काही दिवस यामध्ये फार मोठा बदल अपेक्षित नसल्याचे हवामान विभागाने सांगितले.

सांताक्रूझ केंद्रावर किमान तापमानात घट झाली असली तरी कुलाबा केंद्रावर किमान तापमान स्थिर आहे. गुरुवारी कुलाबा येथे २३ अंश सेल्सिअस किमान तापमानाची नोंद झाली. किमान तापमानात घट झाली असताना गुरुवारी दोन्ही केंद्रावर कमाल तापमान ३० अंशापुढे होते. कुलाबा येथे ३२.९ अंश सेल्सिअस, तर सांताक्रूझ केंद्रात ३३.६ अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद झाली. मुंबईच्या कमाल तापमानात सध्या चढ-उतार सुरू असून काही दिवस हीच स्थिती कायम राहण्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे.

हवा गुणवत्तेत सुधारणा

मागील काही दिवस मुंबईच्या हवेचा दर्जा खालावला होता. अनेक भागात सातत्याने 'वाईट' हवा नोंदवली जात होती. दरम्यान, तीन दिवसांपासून मुंबईच्या हवेत काहीशी सुधारणा झाली आहे. अनेक भागात 'मध्यम' श्रेमीत हवा नोंदली जात आहे. बोरिवली येथे 'समाधानकारक' हवेची नोंद झाली. तेथे हवा निर्देशांक ९४ इतका होता. तर इतर भागात हवा निर्देशांक १०० ते १५०च्या आसपास होता.

## बलात्काराच्या गुन्ह्यात अडकण्याच्या भीतीपोटी केला प्रेयसीचा खून

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२१, नागपूर :** इंस्टाग्रामवरुन ओळख झालेल्या युवकाचे उमरेडमधील एका युवतीशी प्रेमसंबंध जुळले.

त्याने फिरायला नेण्याच्या बहाण्याने जंगलात नेऊन तिच्यावर बलात्कार केला. प्रियकराच्या या कृत्यामुळे प्रेयसीला धक्का बसला. तिने पोलीस ठाण्यात तक्रार देण्याची धमकी प्रियकराला दिली. त्यामुळे त्याने प्रेयसीचा ओढणीने गळा आवळून खून केला.

पोलिसांनी आरोपीला अटक केली असून त्याने बलात्काराचा गुन्हा दाखल होण्याच्या भीतीमुळे प्रेयसीचा खून केल्याची कबुली पोलिसांना दिली. लोकेश जुगनाके (३०, रा. अड्याळ) असे आरोपी युवकाचे नाव आहे.

**जंगलात नेऊन केला बलात्कार**

घराकडे जात असताना लोकेशने एमआयडीसी रस्त्यावर दुचाकी थांबवली. यावेळी लोकेशच्या मनात काहीतरी वेगळेच होते. त्याने महामार्गावरील एका जंगलात नेले. तेथे तिला शारीरिक संबंधाची मागणी केली.

मात्र, तिने नकार दिला. त्यामुळे लोकेशने तिच्यावर बलात्कार केला. या प्रकारामुळे पूजाला संताप आला. तेथेच दोघांचा वाद झाला. तिने उमरेडला पोहचल्यानंतर थेट पोलीस ठाण्यात जाऊन बलात्कार केल्याची तक्रार देणार असल्याचे लोकेशला सांगितले. त्यामुळे लोकेश घाबरला.

## विधानसभेच्या मतमोजणीसाठी प्रशासन सज्ज ! पोलीसांचा चोख बंदोबस्त...

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२१, बुलढाणा :** बुलढाणा जिल्ह्यातील मलकापूर, बुलढाणा, चिखली, सिंदखेड राजा, मेहकर, खामगांव व जळगाव जामोद विधानसभा मतदारसंघाच्या सार्वत्रिक निवडणूकीसाठी २० नोव्हेंबर रोजी मतदान झाले असून मतमोजणी २३ नोव्हेंबर रोजी होणार आहे. मतमोजणीसाठी जिल्हा प्रशासन सज्ज झाले असून प्रचंड पोलीस बंदोबस्तात होणाऱ्या मतमोजणीतून सात विधानसभेच्या ११५ उमेदवारांच्या भाग्याचा फैसला होणार आहे. मतमोजणीसाठी प्रत्येक विधानसभा क्षेत्रासाठी १४ टेबल असणार आहे.

**मतमोजणी ठिकाण याप्रमाणे :** २१-मलकापूर विधानसभा येथील मतमोजणी कृषी उत्पन्न बाजार समिती, बेलाड यार्ड मलकापूर, २२-बुलढाणा विधानसभा येथील मतमोजणी निवडणूक विभाग इमारत, तहसिल चौक मागे बुलढाणा, २३-चिखली विधानसभा येथील मतमोजणी तालुका क्रिडा संकुल बॅडमिंटन हॉल चिखली, २४-सिंदखेडा राज विधानसभा येथील मतमोजणी महाराष्ट्र राज्य वखार सहकार गोदाम, कृषी उत्पन्न बाजार समिती परिसर सिंदखेड राजा, २५-मेहकर विधानसभा येथील मतमोजणी महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ गोदाम क्रमांक ५ मेहकर, २६-खामगांव विधानसभा येथील मतमोजणी सरस्वती विद्या मंदिर हॉल खामगाव, २७- जळगाव जामोद विधानसभा येथील मतमोजणी नवीन प्रशासकीय इमारत जळगाव जामोद येथे होणार आहे.

मतमोजणीच्या फेऱ्या याप्रमाणे : विधानसभेच्या मतमोजणीस त्या-त्या ठिकाणी सकाळी ८ वाजता सुरुवात होणार असून मतदारांच्या संख्येनुसार फे-या होणार आहेत. यात मलकापूर २२ फेऱ्या, बुलढाणा फेऱ्या २४, चिखली २३ फेऱ्या, सिंदखेड राजा २५ फेऱ्या, मेहकर २५ फेऱ्या, खामगांव २३ फेऱ्या व जळगाव जामोद २३ फेऱ्या होतील. प्रथम टपाली मतदानाची मतमोजणी होईल व त्यानंतर ईव्हीएम मतमोजणीस सुरुवात होईल. मतमोजणीसाठी सातही विधानसभा मतदारसंघात प्रत्येक टेबलवर प्रत्येकी एक कोतवाल, मतमोजणी अधिकारी, पर्यवेक्षक व सूक्ष्म निरीक्षकाची नियुक्ती करण्यात आली आहे.

**मतदानाची विधानसभा मतदारसंघनिहाय अंतिम टक्केवारी याप्रमाणे :** मलकापूर विधानसभा मतदारसंघात ७१.१७, बुलढाणा विधानसभा मतदारसंघात ६२.३९, चिखली विधानसभा मतदारसंघात ७२.०७, सिंदखेड राजा विधानसभा मतदारसंघात ७०.२२, मेहकर विधानसभा मतदारसंघात ६८.९७, खामगांव विधानसभा मतदारसंघात ७६.०६, जळगाव जामोद विधानसभा मतदारसंघात ७३.५४ असे एकूण ७०.६० टक्के अंतिम सरासरी मतदान झाले. २१ लक्ष ३४ हजार ५०० मतदारापैकी १५ लक्ष ६ हजार ९२५ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. यामध्ये ७ लक्ष ९१ हजार ८७ पुरुष, ७ लक्ष १५ हजार ८२२ महिला तर १६ तृतीयपंथीय मतदरांनी मतदान केले.

## तरुण तलाठ्याचा अपघाती मृत्यू !

### निवडणूक कर्तव्य बजावून घरी जात असताना काळाचा घाला

**अक्षराज : धर्मेंद्र वर्पे**

**दि.२१, वाई (सातारा) :** सातारा विधानसभा मतदान प्रक्रियेचे कामकाज आटोपून रात्री अडीच वाजता मोटारसायकलवरून भुईंज येथे घरी जात असताना मोटारसायकलचा भीषण अपघात झाला. ऊस भरून उभी असलेल्या ट्रॉलीला पाचवडजवळ पाठीमागून बाईकची धडक बसल्याने रोहित अशोक कदम (वय २८) यांचा अपघाती मृत्यू झाला. या अपघातात रोहित यांच्या डोक्याला जबर मार लागल्याने त्यांना सातारा येथील जिल्हा रुग्णालय दाखल करण्यात आले होते. रोहित यांनी दोन महिन्यापूर्वीच तलाठी म्हणून सजा आलेवाडी येथे रुजू झाले होते. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तलाठी रोहित कदम यांची निवडणुकीच्या कामकाजासाठी आलेवाडी येथे नियुक्ती झाली होती. मतदान प्रक्रियेचे दिवसभर कामकाज करून मतपेट्या सातारा येथे जमा केल्या. त्यानंतर मध्यरात्री दोनच्या दरम्यान ते सातारहून आपल्या भुईंज या मूळगावी मुक्कामासाठी निघाले होते. ते पुणे- बंगळूर राष्ट्रीय महामार्गावरील उडतरे-पाचवडदरम्यान आले असता महामार्गावर उसाने भरलेली ट्रॉली उभी होती. या ट्रॉलीला रिफ्लेक्टर लावले नसल्याने रोहित कदम यांना ती दिसून आली नाही. त्यामुळे त्यांची मोटारसायकल ट्रॉलीला जाऊन धडकली. या धडकेत रोहित यांच्या डोक्याला जबर मार लागल्याने डोक्यातून रक्तस्त्राव झाला. यावेळी महामार्गावरील प्रवाशांनी या घटनेची माहिती भुईंज पोलिसांना कळवली. माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी कदम यांना अधिक उपचारासाठी सातारा जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात केले. मात्र, डोक्यातून अतिरक्तस्त्राव झाल्यामुळे उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. या घटनेमुळे भुईंज गावावर शोककळा पसरली आहे. जिल्हा रुग्णालयात शवविच्छेदन करून मृतदेह आज सकाळी आठ वाजताच्या दरम्यान नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला. भुईंज येथे दुपारी एक वाजताच्या दरम्यान शोकाकुल वातावरणात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. मनमिळावू स्वभावाचा असलेल्या रोहित कदम यांची दोन महिन्यांपूर्वीच तलाठी म्हणून नियुक्ती झाली होती. अवघ्या दोनच महिन्यानंतर ही घटना घडल्याने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. ऐन तारुण्यात मुलाचा मृत्यू झाल्याने आई-वडिलांनी हंबरडा फोडला. रोहित यांचा एक वर्षांपूर्वी विवाह झाला होता.त्यांच्या पश्चात आई-वडील आणि विवाहित बहीण आहे. दरम्यान अपघाताची नोंद भुईंज पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक रमेश गर्जे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस तपास करीत आहेत.



अक्षराज
२ | बुलडाणा, शुक्रवार, दि.२२ नोव्हेंबर २०२४ | विविधा

## संपादकीय



### समाजवादी विचारधारेचे पाईक

समाजवादी पक्षाचे संस्थापक आणि उत्तर प्रदेशचे माजी मुख्यमंत्री तसेच देशाचे माजी संरक्षण मंत्री मुलायमसिंग यादव यांची आज जयंती. मुलायमसिंग यादव यांचा जन्म २२ नोव्हेंबर १९३९ रोजी उत्तर प्रदेशातील सैफई या गावात झाला. मुलायम सिंग यांनी आग्रा विद्यापीठातून एम. ए व जैन इंटर कॉलेज करहल मधून बीटी केले. वयाच्या अवघ्या पंधराव्या वर्षीच त्यांनी राजकीय राजकीय चळवळीत भाग घेतला. १९५४ साली वयाच्या पंधराव्या वर्षी समाजवादी नेते डॉ राम मोहन लोहिया यांच्या चळवळीत भाग घेतल्याने त्यांना तुरुंगवास भोगावा लागला. जेष्ठ समाजवादी नेते डॉ राम मनोहर लोहिया यांना ते गुरू मानत. त्यांच्या विचारांनी प्रेरित होऊनच त्यांनी समाजवादी आंदोलनात भाग घेतला. १९६७ साली मुलायमसिंग यादव युनायटेड सोशालिस्ट पक्षाच्या तिकिटावर प्रथमच विधानसभेत निवडून गेले. १९७५ साली जेंव्हा देशात आणीबाणी घोषित झाली तेंव्हा या आणीबाणीला मुलायम सिंग यादव यांनी कडवा विरोध केला. आणीबाणीच्या काळात मुलायमसिंग यादव यांना १९ महिन्यांचा तुरुंगवास भोगावा लागला. आणीबाणी उठल्यानंतर काँग्रेसला विरोध करण्यासाठी जो जनता परिवार तयार झाला होता त्यात मुलायमसिंग यांची भूमिका खूप महत्वाची होती. मुलायमसिंग यादव, लालूप्रसाद यादव, रामविलास पासवान, बिजू पटनाईक, चंद्रशेखर हे जनता परिवारातील त्यावेळचे तरुण तुर्क नेते होते. या नेत्यांनी मिळून पुढे जनता दल या पक्षाची स्थापना केली. १९८९ साली हा पक्ष केंद्रात सत्तेवर आला मात्र कार्यकाळ पूर्ण करण्याआधीच हे सरकार पडले. पुढे जनता दलात फूट पडली. मुलायमसिंग यादव हे ही जनता परिवारातून बाहेर पडले आणि ४ नोव्हेंबर १९९२ रोजी त्यांनी समाजवादी पक्षाची स्थापना केली. १९९६ साली जेंव्हा केंद्रात तिसऱ्या आघाडीची सत्ता आली तेंव्हा मुलायमसिंग यादव हे पंतप्रधान पदाचे प्रबळ दावेदार होते मात्र काही कारणांनी त्यांना पंतप्रधान होता आले नाही. एच डी देवेगौडा हे भारताचे पंतप्रधान बनले. एच फी देवेगौडा यांच्या मंत्रिमंडळात ते संरक्षण मंत्री बनले. पण हे सरकारही जास्त काळ टिकले नाही त्यानंतर आय. के. गुजराल पंतप्रधान बनले त्यांच्या मंत्रिमंडळात देखील ते मंत्री बनले. याकाळात त्यांनी भाजपला प्रखर विरोध केला. त्यामुळे ते काँग्रेसच्या जवळ गेले असे मानले जात होते मात्र १९९९ साली जेंव्हा काँग्रेसने केंद्रात सत्ता स्थापनेचा प्रयत्न केला तेंव्हा मुलायमसिंग यादव यांनी त्यांना साथ दिली नाही. दरम्यानच्या काळात त्यांनी उत्तरप्रदेश मधील आपला वरचष्मा कायम ठेवला. उत्तर प्रदेश सारख्या देशातील सर्वात मोठ्या आणि महत्वाच्या राज्याचे ते ५ डिसेंबर १९८९ ते २४ जानेवारी १९९१, ५ डिसेंबर१९९३ ते ३ जून १९९६ आणि २९ ऑगस्ट २००३ ते ११ मे २००७ या कालावधीत ते तीनदा उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री राहिले. पुढे त्यांचे सुपुत्र अखिलेश यादव हे देखील उत्तर प्रदेशचे पाच वर्षे मुख्यमंत्री राहिले. उत्तर प्रदेशच्या राजकारणातच नव्हे तर देशाच्या राजकारणात कायम मध्यवर्ती भूमिका बजावणारे मुलायमसिंग हे दिलदार राजकारणी म्हणून ओळखले जात. १० ऑक्टोबर २०२२ रोजी वृद्धापकाळाने त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने समाजवादी चळवळीची मोठी हानी झाली. मुलायमसिंग यादव यांनी आयुष्यभर समाजवादी विचारांची धुरा वाहिली.

समाजवादी विचारांचे पाईक असलेल्या मुलायमसिंग यादव यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

# विधानसभा निवडणुकीतही तोच गोंधळ !

राज्यात काही ठिकाणच्या किरकोळ घटना वगळता यंदाची विधानसभा निवडणूक तशी व्यवस्थित पार् पडली. ४१३६ उमेदवारांचे भवितव्य मशीनबंद झाले. मतदानाचा टक्का वाढावा यासाठी सरकारसह, स्वयंसेवी संस्था, सामाजिक संघटना, आध्यात्मिक संस्था, संप्रदाय, मंडळे तसेच राजकीय पक्षांनीही यंदा बरेच परिश्रम केले. मतदान वाढावे यासाठी सामाजिक माध्यमे तसेच तंत्रज्ञानाचाही पुरेपूर वापर करण्यात आला होता. मतदारांना मतदानासाठी फार लांब जावे लागू नये म्हणून यंदा मतदान केंद्रांची संख्याही वाढवण्यात आली होती. सामान्य नागरिकांनीही आपल्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्सवरून आपल्या मित्र मंडळींना, फॉलोअर्सना मतदान करण्याचे आवाहन केले होते. देशातील महनीय व्यक्तींच्या फोन कॉलसह बस स्टॅन्ड, रेल्वे स्थानके यांसारख्या ठिकाणी अनाउन्समेंट करून लोकांना मतदानाचे आवाहन करण्यात आले; मतदारांना करण्यात आलेले धार्मिक आवाहन हें यंदाच्या निवडणुकीचे प्रमुख वैशिष्ट्य होते. इतक्या मोठ्या प्रमाणात जागृती करूनही दरवेळेस जे होते ते यावेळेसही झाले. लोकसभेच्या तुलनेत मुंबईतील मतदानाचा टक्का वाढला असला तरी ज्या प्रमाणात जनप्रबोधन झाले होते त्या तुलनेने वाढलेली टक्केवारी अगदीच नगण्य आहे. मतदारांतील निरुत्साह यंदा पुन्हा दिसला. असे असले तरी यंदा उत्साही मतदारांची ठिकठिकाणी घोर निराशा झाल्याचे चित्रही अनेक ठिकाणी दिसले. वयाची कितीतरी मतदारांची नावे त्यावेळेसही मतदार याद्यांमधून गायब झाली होती. मुंबईतील घरे भाड्याने देऊन राहण्यासाठी मुंबई बाहेर गेलेले अनेक जण मतदानासाठी मुंबईत आले होते. अशांपैकी अनेकांची नावे मतदार यादीतून गायब झाल्याने त्यांना मतदान न करताच परतावे लागले. घरातील ४ सदस्यांपैकी एका सदस्याचे नाव मतदार याद्यांतून गायब झाल्याने ते शोधण्यामध्ये बुथवर बसलेल्यांची




दमछाक होत होती. एकेकाचे नाव शोधण्यात बराच वेळ लागत असल्याने अनेक बुथवर नागरिकांचे मोठे घोळके झाल्याचे चित्र पाहायला मिळत होते. विशेष म्हणजे ज्यांनी लोकसभा निवडणुकीला मतदान केले अशांचीही नावे काही ठिकाणी लुप्त झाली होती. अनेक ठिकाणी मृत व्यक्तींची नावे मतदार याद्यांत पुन्हा समाविष्ट झालेली पाहायला मिळत होती. निवडणूका दर वर्षी होत नसल्या तरी निवडणूक आयोग निवडणूक जवळ आल्यावरच जागे होते का ? भारतात प्रत्येकाचे आधार कार्ड, मतदान कार्ड, रेशन कार्ड, बँकेतील खाती सरकारने एकमेकांशी लिंक करून घेतली आहेत. एकदा नोंदवलेली नावे अन्य कोणत्याही ठिकाणाहून लुप्त होत नाहीत मग मतदार याद्यांमधूनच ती कशी गायब होतात ? मृत व्यक्तीची सरकार दरबारी नोंद करणे आता सर्वत्र अनिवार्य करण्यात आले आहे. मृत व्यक्तीचे मृत्यू नोंदणी प्रमाणपत्र निघाल्यावरही मतदार याद्यांमधून ते नाव का काढले जात नाही किंवा एकदा काढलेले नाव पुढच्या निवडणुकीच्या वेळी यादीमध्ये कसे काय जोडले जाते ? निवडणूक जाहीर होण्यापूर्वी मतदार याद्या अद्यावत करण्याचे काम कोणाचे आहे ? लोकसभा निवडणुका झाल्यानंतर विधानसभेच्या निवडणुका जाहीर होण्यात बराच कालावधी होता. या काळात याद्या अध्यवत का करण्यात आल्या नाहीत असा संतप्त सवाल मतदारांच्या मनात निर्माण होताना दिसला. या गोंधळाला उत्तरदायी असणाऱ्यांवरही कठोर कारवाई करण्याची मागणीही केली जात आहे. निवडणूक आयोगाचा हा भोंगळ कारभार नागरिकांमध्ये निवडणूक प्रक्रियेविषयी अविश्वास तर निर्माण करतोच, शिवाय बोगस मतदानासही वाव मिळवून देत आहे असे मत राजकीय जाणकारांकडून व्यक्त केले गेले आहे. याशिवाय अनेक मतदार याद्यांमध्ये महिला मतदाराच्या नावासमोर पुरुषाचे छायाचित्र तर पुरुष मतदारांच्या नावापुढे महिलेचे छायाचित्र लावल्याचे दिसून आले. काही मतदारांची नावे यंदा नेहमीच्या मतदान केंद्रात न येता भलत्याच मतदान केंद्रांना जोडली गेल्याने त्यांना विनाकारण धावपळ करावी लागत होती. काही ठिकाणी ईव्हीएम मशिन्स बंद पडल्याने मतदारांचा संताप अनावर झालेला पाहायला मिळाला.

राज्याचे भवितव्य ठरवणारी निवडणूक निर्विघ्न पार पडावी, नागरिकांनी या प्रक्रियेत एकदिलाने सहभाग घ्यावा यासाठी कोट्यवधी रुपयांचा खर्च केला जातो; मात्र प्रशासनाचा भोंगळ कारभार आणि नागरिकांचा निरुत्साह यांमुळे हे गणित कधी साधलेच जात नाही. नागरिकांना पुन्हा पुन्हा आव्हान करूनही नागरिक आपली नावे मतदार याद्यांमध्ये आहेत कि नाही याबाबत आधीच खात्री करून घेत नाहीत. शहरासारख्या ठिकाणी आज प्रत्येकाच्या हातात स्मार्ट फोन आहे. निवडणूक याद्यांमध्ये आपले नाव पडताळण्याची पद्धतसुद्धा प्रशासनाने अत्यंत सोपी केली आहे, तरीही नागरिक मतदार यादीतील आपले नाव शोधण्याचा प्रकार ऐन निवडणुकीच्या दिवशी करतात ज्यामुळे त्यांनाही हाल सहन करावे लागतात. केवळ मतदारांना मतदान करण्यास उद्युक्त करणे पुरेसे नसून घरोघरी जाऊन घरातील सर्व प्रौढ व्यक्तींची नावे मतदार याद्यांमध्ये समाविष्ट आहेत का ? घरातील मृत व्यक्तींची नावे याद्यांतून काढली गेली आहेत का ? नवीन मतदारांची नावे याद्यांमध्ये समाविष्ट झाली आहेत का ? या सर्व पडताळण्या निवडणुकीच्या आधी व्हायाला हव्यात त्यासाठी निवडणूक प्रशासनाने स्वयंसेवी संघटना आणि राजकीय पक्ष यांचे साहाय्य घ्यायला हवे. निवडणूक केंद्राच्या ठिकाणी मतदारांसाठी आवश्यक सुविधा करण्यात आल्या आहेत ना ? ज्या ठिकाणी लोडशेडिंग केली जाते अशा केंद्रांमध्ये जनरेटर आदी व्यवस्था केलेल्या असाव्यात. सर्व मतदान केंद्रामध्ये पुरेशा सुविधांची उपलब्धता केल्याची खात्री प्रमुख पक्षांच्या स्थानिक प्रतिनिधींकडूनही आदल्या दिवशी करून घेतली जावी. यंदाच्या विधानसभा निवडणूक प्रक्रियेतून निवडणूक प्रशासन, राजकीय पक्षांसह नागरिकांनीही बोध घेऊन त्यामध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे.

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

# खंडाळा तालुक्यात मोठ्या संख्येने ६८ टक्के मतदान...

**अक्षराज : सुहास महांगरे**

**दि.२१, शिरवळ :** वाई विधानसभा मतदारसंघात वाई, खंडाळा, महाबळेश्वर या तीन तालुक्याचा समावेश असलेल्या खंडाळा मतदारसंघांमध्ये ६८ टक्के मतदान शांतते पार पडले या निवडणुकीत महायुतीचे राष्ट्रवादीचे विद्यमान आमदार मकरंद जाधव- पाटील आणि महाविकास आघाडीच्या राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार अरुणादेवी पिसाळ यांच्यात सरळ लढत झाली.

शिवसेना (शिंदे गट) अपक्ष उमेदवार पुरुषोत्तम जाधव यांच्या बंडखोरी केल्यामुळे



निवडणुक चुरशीची झाली.वाई खंडाळा महाबळेश्वर विधानसभा मतदारसंघांमध्ये एकूण १५ उमेदवार आपले नशीब आजमावत आहेत. मतदानाला सकाळी सात वाजता सुरुवात झाल्यानंतर सर्व पक्षांचे कार्यकर्त्यांमध्ये उत्साह दिसत होता ठिकठिकाणी कार्यकर्ते मतदारांना मतदान करण्यासाठी घेऊन येत होते.

निवडणूक शांततेत पार पाडावी व जास्तीत जास्त मतदान होण्यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी प्रांताधिकारी राजेंद्र कचरे यांच्या मार्गदर्शनाखाली वाई तहसीलदार सोनाली मेटकरी, महाबळेश्वर तहसीलदार तेजस्विनी पाटील, खंडाळा तहसीलदार अजित पाटील यांनी सहकाऱ्यांसमवेत मतदान प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी प्रयत्नशील होते.

महायुतीचे उमेदवार आमदार मकरंद पाटील तसेच महाविकास आघाडीच्या उमेदवार अरुणादेवी पिसाळ, अपक्ष उमेदवार पुरुषोत्तम जाधव व इतर उमेदवार यांनी काही मतदार केंद्रावर भेट देऊन मतदानाची माहिती घेतली. तसेच कायदा व सुव्यवस्थेसाठी प्रत्येक मतदान केंद्रावर पोलीस बंदोबस्त चोख ठेवण्यात आला होता. यावेळी शिरवळ, पळशी, शिंदेवाडी, विंग, गुठाळे, राजेवाडी, वडवाडी, हरतळी भाटघर तसेच पंचक्रोशी मध्ये तरुण वर्गाने आणि महिलांनी व ग्रामस्थांनी उत्स्फूर्त पणे मतदान केले. शनिवार दिनांक २३ रोजी वाई औद्योगिक वसाहतीतील वखार महामंडळाच्या गोदामा मध्ये मतमोजणी होणार आहे. कोणताही अनुचित प्रकार घडला नाही. मतदान शांततेत पार पडले.

## धोका...

विचारा आपले मना
दिलाकुणाला धोका
हवी हवीशी सत्ताई
वेळी साधला मोका

जिंकलेल्या नेत्यांनी
रिकामाकेला खोका
बाहेर पाडा मळमळ
साठली गरळ ओका

वाद दादा बहिणीशी
भांडती पुतणे काका
परिवारात राहे सत्ता
एवढेचं पहावे बरं का

जनता पिडे दुष्काळे
अडचणी प्रसंगबाका
मदतीला नाही कुणी
बळीराजा मारे हाका

विषयफक्त रे एकमेव
आलेल्या निवडणूका
समस्या इतर गौण हो
विसरल्या अडवणूका

दुर्लक्ष पुढारी मंडळीचे
उडला महागाईभडका
फिसला जातो जोरात
सामान्यमाणूसकडका

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

# 'एग्जिट पोल' म्हणजे निकालापूर्वीचे मनोरंजन !

राज्याच्या विधानसभा निवडणुका पार पडल्या आणि तासाभरात राज्यातील समस्त वृत्तवाहिन्यांनी एग्जिट पोलचा निकष दाखवण्यास सुरुवात केली. मागील काही वर्षांपासून निवडणुकानंतर एक्सिट पोलचे निकाल दाखवण्याची प्रथा भारतात जोर धरू लागली आहे. कोणत्यातरी संस्थांच्या मार्फत हे एग्जिट पोल आखले जातात आणि वृत्तवाहिन्यांशी संगनमत करून ते लोकांसमोर ठेवले जातात.

हें एग्जिट पोल वृत्तवाहिन्यांच्या पडद्यावर दाखवताना स्टुडिओमध्ये चर्चा घडवून आणण्यासाठी प्रमुख पक्षांच्या प्रतिनिधींना, राजकीय विश्लेषकांना निमंत्रित केले जाते. एग्जिट पोलने दाखवलेल्या आकडेवारीच्या अनुषंगाने एखाद्या क्षेत्रातील पक्षाची घसरण अथवा प्रगतीच्या अनुरूप पक्षाच्या प्रतिनिधिला प्रश्न विचारले जातात आणि त्यातून आम्ही दाखवलेला एग्जिट पोल कसा खरा आहे हे त्यांच्याकडून




वदवण्याचा प्रयत्न केला जातो: मात्र या प्रयत्नांना यश कधीच येत नाही.

प्रत्येक पक्षाच्या प्रतिनिधीची उत्तरे ठराविक आणि एकसारखीच असतात ती म्हणजे 'खरे काय ते निकालाच्या दिवशीच कळेल' 'राज्याच्या विकासासाठी यावेळेस जनतेने आम्हालाच मोठ्या प्रमाणात मतदान केले आहे' 'आम्हालाच स्पष्ट बहुमत मिळून राज्यात आमचेच सरकार बनेल'. मुलाखतकाराने कितीही उलट सुलट प्रश्न विचारले तरी या मंडळींच्या उत्तरांमध्ये मात्र फारसा फरक पडत नाही.

वृत्तवाहिन्यांवरील एकूणच माहोल पाहता एग्जिट पोलचा दिवस म्हणजे वृत्तनिवेदकांची, संपादकांची आणि राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींची जणू रंगीत तालीम असते. लाखो रुपये व्यय करून मांडण्यात येणारे हें एग्जिट पोल वेगवेगळ्या वाहिन्यांवर थोड्याबहुत फरकाने वेगवेगळे असतील याची विशेष दक्षता घेतली जाते. यापूर्वीच्या निवडणुकापूर्वी मांडण्यात आलेले एग्जिट पोलचे अंदाज आणि प्रत्यक्षात निवडणुकांतील आकडेवारी यामध्ये मोठी तफावत येत असल्याचे लक्षात आले आहे. त्यामुळे यंदासुद्धा एग्जिट पोल्सने मांडलेल्या निकालाच्या अंदाजांना निकालापूर्वीच्या मनोरंजनाव्यतिरिक्त फारशी किंमत आहे असे वाटत नाही.

**सौ. मोक्षदा घाणेकर, काळाचौकी, मुंबई**

# मदतीचा हात उपक्रमात विद्यार्थी स्वयंसेवक सहभागी...

**अक्षराज : धर्मेंद्र वर्पे**

**दि.२१, खंडाळा (सातारा) :** महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार खंडाळा अजित पाटील, खंडाळा तालुका स्वीप मतदान जनजागृती अभियान मुख्य नोडल अधिकारी तथा गटशिक्षणाधिकारी गजानन आडे यांच्या सूचनेनुसार व प्राचार्य शब्बीर नालबंद यांच्या परिश्रम व संकल्पनेतून आदर्श मतदान केंद्र ११७ - राजेंद्र विद्यालय, खंडाळा ची उभारणी केली. यासाठी केंद्रप्रमुख सुनिता साबळे, विस्तार अधिकारी रमेश यादव यांचे सहाय्य मिळाले.

मतदान दिनी २० नोव्हेंबर २०२४ स. ०७:०० ते सायं.०६:०० वाजेपर्यंत दिव्यांग व वृद्ध मतदारांसाठी मदतीचा हात या उपक्रमाची कृतीतून अंमलाबजावणी होण्यासाठी सुशिला शंकरराव गाढवे महाविद्यालय, खंडाळा मधील राष्ट्रीय सेवा योजना व सांस्कृतिक विभागात सहभागी असणाऱ्या विद्यार्थी स्वयंसेवक अक्षय आशा देशमाने-बी.ए.भाग ०२, प्रेरणा जयसिंग क्षीरसागर बी.कॉम.भाग ०२, पायल सचिन पवार- बी.कॉम.भाग ०२ यांनी उस्फूर्त सहभाग घेऊन राष्ट्रीय कर्तव्याची जबाबदारी नेटाने पार पाडली.

या कार्यात विद्यार्थ्यांना कौशल्य विकास विभाग प्रमुख प्रा.अमीर इनामदार यांनी प्रोत्साहन दिले. शिक्षण महर्षी शंकरराव गाढवे, सचिव संजीव(अनिरुद्ध) गाढवे, सर्व संचालक मंडळ, प्राचार्य डॉ. हणमंत जाधव, प्राध्यापक वृंद, कार्यालयीन कर्मचारी वृंद यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## मंजिरी वाडेकरची एफएसकेओ जागतिक कराटे स्पर्धेत चमकदार कामगिरी



**अक्षराज : सुनिल साखरकर**

**दि.२१, मुंबई :** २४वी एफ एस के ओ जागतिक कराटे स्पर्धा २०२४, पेडम स्टेडियम,म्हापसा. गोवा. येथे दि ७ ते १० नोव्हेंबर २०२४ दरम्यान संपन्न झाली.या स्पर्धेत मुंबई उपनगर च्या शिवनेरी स्पोर्ट्स क्लब, विलेपार्ले येथील, २० किलो खालील वजनी गटात कु मंजिरी नितीन वाडेकर हिने चमकदार काम गिरी करत काता प्रकारात कांस्य पदक मिळवले. त्याबद्दल शिवनेरी स्पोर्ट्स क्लबच्यावतीने मंजिरीचे व प्रशिक्षक आणि पालक नितीन वाडेकर यांचे सर्वत्र अभिनंदन व शुभेच्छाचा वर्षाव होत आहे.

## गत निवडणुकीपेक्षा मतदानात जवळजवळ सात टक्क्यांची वाढ

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२१, अकोला :** जिल्ह्यात विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी दि. २० नोव्हेंबर रोजी उत्साहात मतदान पार पडले. गेल्या विधानसभा निवडणुकीच्या तुलनेत मतदानाची टक्केवारी ६.९६ टक्के अर्थात जवळजवळ सात टक्के इतकी वाढली आहे. पाचही मतदारसंघात मतदान प्रक्रिया शांततेत पार पडल्याबद्दल जिल्हा निवडणूक अधिकारी अजित कुंभार यांनी मतदार, राजकीय पक्ष, उमेदवार व निवडणुकीसाठी सहकार्य करणा-या विविध घटकांचे आभार मानले आहेत. गेल्या २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत मतदानाची टक्केवारी ५७.८० एवढी होती. यात सुमारे ७ टक्के वाढ होत यावर्षी ६४.७६ टक्के मतदान झाले आहे. मतदानाच्या टक्केवारीत ही मोठी वाढ आहे.

जिल्हाधिका-यांनी व्यक्त केले सर्वांचे आभार –

मतदार जागृतीसाठी प्रशासनाचे सातत्यपूर्ण प्रयत्न, व्यापक जनजागृती ,'स्वीप' उपक्रमात राबवलेले अनेक अभिनव उपक्रम यामुळे मतदानात वाढ झाली. ज्येष्ठ, महिला, तरूण, नवमतदार आदींनी मतदान प्रक्रियेत उत्साहात सहभाग घेतल्याने जिल्ह्यातील मतदानाच्या टक्केवारीत लक्षणीय वाढ झाली आहे. मतदानात नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. निवडणूक प्रक्रियेत मतदार, राजकीय पक्ष, निवडणूक प्रक्रियेत सहभागी सर्व यंत्रणा, विविध संस्था, सर्व घटक यांनी सहकार्य केले. त्यामुळे मतदान प्रक्रिया शांततेत पार पडली, अशा शब्दांत जिल्हाधिकारी श्री. कुंभार यांनी सर्वांचे आभार मानले आहेत. जिल्ह्यातील ५ विधानसभा मतदारसंघात ५ लाख ५९ हजार ७५७ पुरूष, ५ लाख ८७९ महिला आणि इतर १६ अशा एकूण १० लाख ६० हजार ६५२ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला आहे. जिल्ह्याची एकूण मतदानाची टक्केवारी ६४.७६ आहे. अकोट मतदारसंघात ६८.३५ टक्के मतदान झाले. यात १ लाख १४ हजार २४८ पुरुष आणि ९८ हजार ४४२ महिला, अशा एकूण २ लाख १२ हजार ६९० मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. बाळापूर मतदारसंघात ७०.६० टक्के मतदान झाले. १ लाख १६ हजार २१२ पुरुष, १ लाख २ हजार ८०५ महिला आणि १ इतर अशा एकूण २ लाख १९ हजार १८ जणांनी मतदानाचा हक्क बजावला. अकोला पश्चिम मतदारसंघात ५७.९७ टक्के मतदान झाले. यात १ लाख ४ हजार ८०९ पुरुष, ९८ हजार ५३१ महिला आणि ७ इतर अशा एकूण २ लाख ३ हजार ३४७ जणांनी मतदानाचा हक्क बजावला. अकोला पूर्व मतदारसंघात ६१.६० टक्के मतदान झाले. यात १ लाख १४ हजार ५९० पुरुष, १ लाख ४ हजार २१८ महिला, इतर ३ अशा एकूण २ लाख १८ हजार ८११ जणांनी मतदानाचा हक्क बजावला. मूर्तिजापूर मतदारसंघात ६६.५९ टक्के मतदान झाले. यात १ लाख ९ हजार ८९८ पुरुष, ९६ हजार ८८३ महिला, इतर ५ अशा एकूण २ लाख ६ हजार ७८६ जणांनी मतदानाचा हक्क बजावला.

## निवडणूक आयोगाकडून मतमोजणी निरिक्षकांची नियुक्ती

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२१, वर्धा :** विधानसभा निवडणुकीसाठी दि.२० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान झाले असुन दि.२३ नोव्हेंबर २०२४ रोजी आर्वी, देवळी, हिंगणघाट व वर्धा या चारही विधानसभा मतदार संघातील क्षेत्रात मतमोजणी होणार आहे. मतमोजणीसाठी निवडणूक आयोगाने वेगवेगळ्या विधानसभेसाठी वेगवेगळे चार मतमोजणी निरिक्षक नियुक्त केले आहेत.

वर्धा विधानसभा मतदार संघाची मतमोजणी जी.एस. कॉलेज येथे होणार असून सामान्य निरिक्षक व मतमोजणी निरिक्षक म्हणुन विनय बुबलानी यांची नियुक्ती केली आहे. शासकीय विश्रामगृह वर्धा येथील वंसत या कक्षात त्यांचा मुक्काम असुन ८२६३८८९२६८ हा त्यांचा संपर्क क्रमांक आहे. आर्वी विधानसभा संघाची मतमोजणी प्रशासकीय इमारत तळेगाव रोड आर्वी येथे होणार असुन सामान्य निरिक्षक व मतमोजणी निरिक्षक म्हणुन जय प्रकाश सिंग यांची नियुक्ती करण्यात आली आहे. शासकीय विश्रामगृह वर्धा येथील वर्षा या कक्षात त्यांचा मुक्काम असुन ७६६६१२४७१६ हा त्यांचा संपर्क क्रमांक आहे.

हिंगणघाट विधानसभा मतदार संघाची मतमोजणी तहसिल कार्यालय, सिव्हील लाईन रेल्वे स्टेशन रोड हिंगणघाट येथे होणार असुन मतमोजणी निरिक्षक म्हणुन अनिल कुमार सिंग यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांचा मुक्काम शासकीय विश्रामगृह वर्धा येथील शिशिर या कक्षात आहे. त्यांचा संपर्क क्रमांक ९०२१६९५४२७ असा आहे.

देवळी विधानसभा मतदार संघांची मतमोजणी तहसिल कार्यालय, पहिला मजला, पुलगाव रोड देवळी येथे होणार असुन मतमोजणी निरिक्षक म्हणुन विवेक अगरवाल यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांचा मुक्काम शासकीय विश्राम वर्धा येथील शरद कक्षात असुन ८६६८९३६८३८ असा आहे. निवडणूक आयोगाने नियुक्ती केलेल्या चारही मतमोजणी निरिक्षकांना भेटण्याची वेळ शुक्रवारी सकाळी ९.३० ते १०.३० ही असणार आहे. नागरिकांना मतमोजणी संबंधी तक्रारी किंवा अडचणी असल्यास नमुद वेळेत संपर्क करता येणार आहे. अशी माहिती नोडल अधिकारी निरिक्षक संजय बमनोटे यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे दिली आहे.

## १२५ कोटीच्या संशयित व्यवहारांप्रकरणी एकाला अटक

**दि.२१, मुंबई :** मालेगाव बँकेतील १२५ कोटी रुपयांच्या संशयास्पद व्यवहारांप्रकरणी सक्तवसुली संचलनालयाने अहमदाबाद विमानतळावरून अक्रम मोहम्मद शफीला अटक केली. त्याच्याविरोधात लुक आऊट सर्कुलर जारी करण्यात आले होते. तो दुबईला जाण्याचा प्रयत्न करत असताना इमिग्रेशन अधिकाऱ्यांनी त्याला ताब्यात घेतले. मालेगाव येथील सिराज अहमदने दोन बँकांमध्ये १४ खाती उघडून त्यातील रकमेचा निवडणुकीसाठी कथित गैरवापर केल्याच्या आरोप आहे. याप्रकरणी ईडीने गेल्या आठवड्या ठाणे, वाशी, मालेगाव, नाशिक, सूरत आणि अहमदाबादमध्ये व्यापारी आणि बनावट कंपन्यांशी संबंधित २४ ठिकाणी छापे टाकले होते. गेल्या सहा महिन्यांपासून मालेगावमधील १४ बँक खात्यांमध्ये सुमारे १२५ कोटी रुपये जमा झाले असून त्यातील रक्कम अहमदाबाद येथील १० बँक खात्यांवर हस्तांतरित झाली आहे. अहमदाबाद येथील १० बँक खात्यांमध्ये २०० कोटी रुपयांचे व्यवहार झाल्याचे अधिकाऱ्याने सांगितले. बँक खात्यातून ही रक्कम काढण्यात आली आहे.

## आसे ग्रामपंचायतच्या गावपाड्यांना सौर ऊर्जेच्या सहाय्याने उचल पाणी प्रकल्पाचे वरदान

**अक्षराज : सौरभ कामडी**

**दि.२१, मोखाडा :** मोखाडा तालुक्यातील आसे ग्रामपंचायतीतील पाणीटंचाईचा कायमस्वरूपी प्रश्न मार्गी लावण्यासाठी दिगंत स्वराज फाऊंडेशन व टाटा कॅपिटलच्या प्रोजेक्ट जलधारा अंतर्गत सौर ऊर्जेच्या सहाय्याने उचल पाणी प्रकल्प उभारण्यात आला आहे. २०२२-२३ या काळात हा प्रकल्प दोन टप्प्यांमध्ये पूर्ण करण्यात आला असून, त्याचा लाभ अनेक गावपाड्यांना मिळत आहे.

**प्रकल्पाची प्रमुख वैशिष्ट्ये**

**फेज – १ :** दापटी – १, दापटी – २, इखरीचापाडा, नावळ्याचा पाडा

**फेज – २ :** आसे, स्वामीनगर, आश्रमशाळा

**उगमस्थान :** वाघ नदीतील वासदा दहाड येथून ३०० हेड उंचीवर, १६०० मीटर अंतरावर पाणी उचलण्यात आले.

**सौर ऊर्जेचा वापर :** ३० ज्ञथ व १५ ज्ञथ क्षमतेचे दोन सोलर सिस्टम्स बसवले.



**साठवण क्षमता :** ५०,००० लिटर व २५,००० लिटर क्षमतेच्या २ टाक्या उभारल्या.

**पाईपलाईन :** एकूण ८ किमी अंतरावर पाणीपुरवठा.

**पाण्याचे हौद :** २२ हौद तयार करण्यात आले, ज्यामध्ये प्रति ३० घरांमागे १ हौद असून ८,००० लिटर पाण्याची क्षमता आहे.

**घरगुती पाण्याचे फिल्टर :** प्रत्येक घराला फिल्टर देण्यात आल्याने आरोग्य समस्यांवर तोडगा निघाला आहे.

**परिणाम आणि नागरिकांचा आनंद**

पूर्वी पाण्यासाठी संपूर्ण रात्र जागरणे व लांब अंतरावरून पाणी आणण्याची वेळ येत असे. मात्र या प्रकल्पामुळे महिलांच्या, वृद्धांच्या, आणि मुलांच्या चेहऱ्यावर आनंद झळकतो आहे. पाणीटंचाईने त्रस्त गावांमध्ये आता समाधानाचे वातावरण आहे.

**प्रकल्पाच्या यशासाठी श्रमदान व कौतुक**

दिगंत स्वराज फाऊंडेशनचे संचालक राहुल भाऊ तिवरेकर आणि CEO श्रद्धाताई श्रुगारपुर यांची भूमिका या यशस्वी प्रकल्पात महत्त्वाची ठरली. ग्रामस्थांच्या श्रमदानामुळे हा प्रकल्प अधिक प्रभावीपणे पूर्ण झाला असून, या दोन्ही संस्थांचे कौतुक सर्वत्र होत आहे. सौर ऊर्जेच्या साहाय्याने साकारलेल्या या पाणी उचल प्रकल्पाने आसे ग्रामपंचायत क्षेत्रातील जलसमस्या कायमस्वरूपी सोडवली आहे, हीच या प्रकल्पाची सर्वात मोठी जमेची बाजू आहे.

## तब्बल ४२ वर्षांनी संपन्न झाले माजी विद्यार्थ्यांचे स्नेह संमेलन...

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२०, आळेफाटा (जुन्नर) :** अहिल्यानगरच्या अकोले तालुक्यातील बेलापूर (बदगी) येथील रयत शिक्षण संस्थेच्या श्री रामदास हायस्कूल या विद्यालयात शिक्षण घेतलेल्या १९८३ च्या दहावीच्या बॅचच्या माजी विद्यार्थ्यांचे स्नेह संमेलन नुकतेच आळेफाटा येथील गुरुदेव हॉटेलमध्ये मोठ्या उत्साहात आणि आनंदाच्या वातावरणात संपन्न झाले.तब्बल बेचाळीस वर्षानंतर प्रथमच संपन्न होणाऱ्या या दिमाखदार सोहळ्यास तत्कालीन आदरणीय शिस्तप्रिय शिक्षक श्रीयुत पावशे सर हे आवर्जून उपस्थित होते,तर त्याच काळातील दुसरे आदरणीय शिक्षक कै.झोपे सर यांचे जावई डॉ.भारांबे सर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.



तत्कालीन शिक्षक कै.कुंभार सर यांचे सुपुत्र श्रीराम कुंभार हे देखील माजी विद्यार्थी म्हणून सदर सोहळ्यात सहभागी झाले होते,तर राज्यभरात नोकरी व्यवसायानिमित्त गेलेले तब्बल चाळीस माजी विद्यार्थी या सोहळ्यास उपस्थित होते.

शाळा सोडून तब्बल बेचाळीस वर्षे लोटल्यानंतर प्रथमच होत असलेली ही सामूहिक एकत्रित भेट म्हणजे सर्वांसाठी एक आनंदाची पर्वणीच होती.यामुळे प्रत्येक विद्यार्थ्यांमध्ये कमालीची उत्सुकता तर होतीच, पण शालेय जीवनातील मित्रांची भेट होत असल्याने सर्वांनाच या भेटीची तीव्र ओढ लागलेली होती.

याच कारणास्तव या स्नेह मेळाव्यात तत्कालीन सर्वच विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून आपला आनंद व्यक्त केला.

विशेष बाब म्हणजे १९८३ च्या त्या काळातील बॅचच्या चार मुलींनी देखील या संमेलनात भाग घेतल्याने संमेलनाचा आनंद द्विगुणित होताना दिसला.

शालेय जीवनातील स्नेह संमेलन म्हणजे एक प्रकारचा आनंदोत्सव असतो. विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव देणारा तो एक उत्सवच असतो.

म्हणूनच तर बेचाळीस वर्ष होऊन देखील या संमेलनात सहभाग घेणाऱ्या माजी विद्यार्थ्यांचा आनंद तथा उत्साह तसुभर देखील कमी झालेला दिसला नाही. प्रत्येकाच्या चेहऱ्यावरील मित्र भेटीचा आनंद संमेलनात देखील ओसंडून वाहताना दिसत होता.

प्रत्येकजण शालेय जीवनातील आपल्या जुन्या आठवणीत रमताना दिसला.

या संमेलनाच्या सुरुवातीलाच गुरुवर्य पावशे सरांच्या शुभहस्ते दीप पूजन करण्यात आले. प्रमुख पाहुणे डॉ. भारांबे यांच्या हस्ते श्री गणेश पूजा व सरस्वती पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

कार्यक्रमाच्या सुरुवातीलाच दिवंगत शिक्षक आणि दिवंगत सोबतीचे विद्यार्थी यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

यानंतर उपस्थित शिक्षक आदरणीय पावशे सर आणि प्रमुख पाहुणे डॉ. भारांबे यांचे शाल तथा पुष्पगुच्छ देऊन सन्मानाने स्वागत करण्यात आले.कार्यक्रमात उपस्थित असलेल्या मुलींचा देखील शाल,पुष्पगुच्छ देऊन विशेष सन्मान करण्यात आला.तसेच ज्या माजी विद्यार्थ्यासाठी हा सोहळा घडवून आणला अशा १९८३च्या दहावीच्या बॅचच्या आणि याच काळातील उपस्थित सर्व विद्यार्थ्यांचा देखील शाल आणि पुष्पगुच्छ देऊन सन्मान करून स्नेह संमेलनाच्या सोहळ्यास खरी सुरुवात करण्यात आली.

कार्यक्रमाच्या दरम्यान प्रत्येक विद्यार्थ्याने आपली माहिती देतानाच स्वतःच्या शालेय जीवनातील आठवणी सांगितल्याने सर्वजण या जुन्या आठवणीत रममाण होताना दिसले.गुरुवर्य पावशे सरांच्या शिस्तीबद्दल बोलत असताना सर्वजण भाराऊन गेले होते. पावशे सर आणि इतर शिक्षकांच्या कडक शिस्तीमुळेच सर्व विद्यार्थी यशस्वीरित्या घडल्याचे प्रत्येकाने आपल्या मनोगतात यावेळी सांगितले.

तसेच येथूनपुढे सर्वांनी सर्वांच्या सुखदुःखात होता यावे म्हणून सर्वच जणांनी सर्वांच्याच कार्यक्रमांना उपस्थित राहण्याचा आग्रह धरला आणि अशाच प्रकारचे स्नेह संमेलन प्रत्येक वर्षी आयोजित करण्याची विनंती देखील केली.

विद्यार्थ्यांच्या या आपुलकीच्या स्नेहाला भाराऊन गेलेल्या पावशे सरांनी उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना धान्यवाद दिले आणि बेलापूर गावातील ग्रामस्थांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त केली.तसेच यापुढे ते अशाचप्रकारे कार्यक्रमास उपस्थित राहतील अशी ग्वाही दिली.

शेवटी प्रमुख पाहुणे आणि गुरुवर्य शिक्षक श्रीयुत पावशे सर आणि उपस्थित सर्व विद्यार्थी व विद्यार्थिनींचे आभार व्यक्त करून

कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

दरम्यान हा स्नेह संमेलन सोहळा यशस्वी होण्यासाठी संजय पंडित, भास्कर गवांदे, रभाजी फापाळे, बाळू फापाळे, दिलीप कोकाटे, संतोष शिरसाट, सचिन फापाळे, राजाराम फापाळे, राजाराम शिंगोटे, भिकाजी भागवत आणि इतरही सर्वच माजी विद्यार्थ्यांनी विशेष मेहनत घेतली होती.

विशेष बाब म्हणजे या सोहळ्यास गोपीनाथ उकिरडे कर्नाटक मधून तर मच्छिंद्र शिंगोटे हे सावंतवाडी कोकण येथून उपस्थित झाले होते.

तर निलिमा भारांबे, राधा पाबळे, मीरा बोडके आणि नंदा फापाळे या विद्यार्थिनींनी देखील उपस्थितीत राहून या कार्यक्रमाची शोभा अधिकच वाढवली होती.

या दिमाखदार स्नेहसंमेलनाचे तंत्रशुद्ध सूत्रसंचालन बाळशिराम फापाळे यांनी केले होते तर प्रस्तावना श्रीयुत श्रीराम कुंभार सर यांनी केली होती.

## भव्य पालखी व पदयात्रा सोहळा- २०२४ चे आयोजन...

### पालखी निमित्ताने दोन देवींची आदिशक्ती बहिणींची होणार भेट

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.२१, शिळफाटा (ठाणे) :** पालखी निमित्ताने दोन आदिशक्ती बहिणींची होणार भेट, शिळगांवाची श्री खरवली आई आणि कार्लाची एकविरा आईची भेट होणार आहे. श्री खरवली आई पालखी ग्रुप शिळगांव तर्फे भव्य पदयात्रा व पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आला आहे. श्री खरवलीआईची भव्य पालखीची सुरुवात श्री खरवलीआईच्या मंदिरापासून होणार आहे.

भव्य पालखीचे व पदयात्रा सोहळ्याचे शिळगांव ते एकविरा आई कार्ला मंदिर तीर्थक्षेत्रापर्यंत आयोजन करण्यात आले आहे. पालखीची सुरुवात २१ नोव्हेंबर २०२४ ते २४ नोव्हेंबर २०२४ पर्यंत आयोजन करण्यात आला आहे. या पालखी सोहळ्याचे आणि पदयात्रांचा उत्साह वाढवण्यासाठी पंचक्रोशीतील भाविक भक्त मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत. पालखीची प्रस्थान २१ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी ६:०० वाजता खरवलीआई मंदिर शिळगांव येथून होणार आहे. रविवारी दिनांक २४ नोव्हेंबर २०२४ रोजी श्री क्षेत्र एकविरा कार्ला येथे भंडारा चे आयोजन करण्यात आले आहे. परतीचा प्रवास दुपारी ३:०० नंतर असणार आहे. तसेच गुरुवार दिनांक २८ नोव्हेंबर २०२४ रोजी श्री खरवलीआई चा भंडारा श्री खरवलीआई मंदिर शिळगांव, पोस्ट-पडले ता.जि.ठाणे या ठिकाणी सायंकाळी ४ ते ९ वाजेपर्यंत आयोजन करण्यात आले आहे.





श्री खरवलीआई ही एकविरा आईची छोटी बहीण आहे. त्यामुळे आगरी कोळी बांधव भक्त भावीक आईच्या पालखीला खांदा देण्यासाठी मोठ्या संख्येने येणार आहेत. आणि या दिवशी आय माऊलीचा उदो....उदो... आई आयलो.... च्या नामघोषांनी अवघा शिळगाव दुमदुम निघणार आहे.

यावेळी पालखीचे दर्शन घेण्यासाठी व सोहळा याची देही याची डोळा पाहण्यासाठी भाविक शिळगावा मध्ये तुफान गर्दी करणार आहेत. चला तर मग येताना तुम्ही आईचे दर्शन घेण्यासाठी सकाळी, आपल्या भव्य पालखीच्या मिरवणुकीत पारंपरिक वेशभूषा, ग्रुपचे पदाधिकारी, सभासद वर्ग महिला कार्यकर्ता आणि ढोल पथक सहभागी असणार आहेत. ही पालखी व्यवस्थितरित्या पार पडण्यासाठी दिवस रात्र जे मेहनत घेत आहेत श्री खरवली आई सेवा ट्रस्ट शिळगांव, श्री खरवली आई पालखी ग्रुप शिळगांव, खाडी, फडकेपाडा तसेच पंचक्रोशीतील ग्रामस्थ मंडळ मेहनत घेत आहेत.

## आरोग्य विभागातर्फे पुरुष नसबंदी शस्त्रक्रिया पंधरवडा

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२१, छत्रपती संभाजीनगर :** कुटुंब नियोजन ही बाब लक्षात घेता आरोग्य विभागाच्या वतीने आजपासून (दि.२१) ते बुधवार दि.४ डिसेंबर या कालावधीत पुरुष नसबंदी शस्त्रक्रिया पंधरवडा राबविण्यात येत आहे. पुरुष नसबंदी विषयी जनजागृती करणे, लोकांना पुरुष नसबंदीचे महत्व पटवुन देणे, स्त्रीयांप्रमाणे कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करण्याची जबाबदारी ही पुरुषांची सुद्धा आहे, या विषयी माहिती देऊन समुपदेशन करणे हे या अभियानाचे उद्दिष्ट आहे. हे अभियान दोन टप्प्यांमध्ये राबविण्यात येणार आहे. पहिल्या टप्प्यात दि.२१ ते दि.२७ नोव्हेंबर दरम्यान लाभार्थ्यांशी संपर्क साधणे. त्यांना पुरुष नसबंदीचे महत्व पटवून देणे व प्रवृत्त करणे, योग्य जोडप्यांच्या याद्या तयार करणे.ज्यांनी यापुर्वी पुरुष नसबंदी शस्त्रक्रिया केली आहे. अशा लाभार्थ्यांमार्फत मोहीमेचा प्रचार व प्रसार करुन माहीती देण्यात येईल.

दुसऱ्या टप्प्यात दि.२८ नोव्हेंबर ते दि.४ डिसेंबर 'सेवा आठवडा' म्हणुन राबविण्यात येणार आहे. यामध्ये जिल्हा व तालुकास्तरीय लाभार्थ्यांचे शस्त्रक्रियेसाठी पूर्व नोंदणी करुन शिबिरे आयोजित करण्यात येतील. पुरुष नसबंदी शस्त्रक्रिया मोफत करण्यात येणार असुन लाभार्थ्यास १ हजार ४५१ रु. प्रोत्साहनपर अनुदान देण्यात येणार आहे.या अभियानात जास्तीत जास्त पुरुषांनी नसबंदी शस्त्रक्रिया करुन घ्यावी,असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.अभय धानोरकर, अति. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.बाळकुष्ण लांजेवार यांनी केले आहे.

# पंढरपूर विधानसभेची १४ टेबलवरून होणार २५ फेऱ्यात मतमोजणी

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.२१, पंढरपूर :** पंढरपूर विधानसभा निवडणुकीची मतमोजणी दिनांक २३ नोव्हेंबर रोजी सकाळी ८ वाजता सुरू होणार आहे. यासाठी १४ टेबलवरुन २५ फेऱ्यात मतमोजणी होणार आहे. याकरीता प्रशासनाने आवश्यक ती तयारी पूर्ण केली आहे. मतमोजणीसाठी सुमारे २१५ अधिकारी कर्मचारी तर सुरक्षेसाठी १३७ पोलीस अधिकारी कर्मचारी नियुक्त करण्यात आले असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी सचिन इथापे यांनी दिली.

पंढरपूर विधानसभा मतदारसंघात एकूण २ लाख ५९ हजार ७४४ मतदारांनी मतदान केलेले असून, मतदारसंघाची मतमोजणी दि. २३ नोव्हेंबर रोजी शासकीय धान्य गोदाम, रेल्वे मैदान सम ोर, कराड रोड पंढरपूर येथे होणार आहे. मतमोजणीसाठी १४ टेबल ची संख्या आहे. तर २५ फेऱ्यांतून मतमोजणी पूर्ण होणार आहे. एका टेबलवर एक मतमोजणी पर्यवेक्षक, एक मतमोजणी सहाय्यक, एक शिपाई व एक सूक्ष्म निरीक्षक राहणार आहे. तसेच मतमोजणी कक्षात मतमोजणी अधिकारी, कर्मचारी, निवडणूक निर्णय अधिकारी, निरीक्षक, उमेदवार व निवडणूक मतमोजणी प्रतिनिधी यांच्यासाठी बसण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. मतमोजणीकक्षात पुरेसा वीज पुरवठा व जनरेटर बॅकअप, सीसीटीव्ही यंत्रणा आदी सुविधा असणार आहे. संपूर्ण सुरक्षा व्यवस्थेसह आग प्रतिबंधक सुविधा, स्वच्छतागृह, प्राथमि क वैद्यकीय सेवा असणार आहेत.




मतमोजणी केंद्रात निवडणूक निर्णय अधिकारी यांनी दिलेल्या अधिकृत पासधारकांसह मतमोजणीसाठी नियुक्त केलेले अधिकारी, कर्मचारी तसेच मोजणी प्रतिनिधी यांनाच प्रवेश दिला जाईल. मतमोजणी कक्षात म ोबाईल तसेच आक्षेपार्ह वस्तू नेता येणार नाहीत. तसेच स्वतंत्र माध्यम कक्ष स्थापन करण्यात आला असून त्याद्वारे म ाध्यम प्रतिनिधींपर्यंत माहिती पोहोचवली जाणार आहे.

सुरक्षा व गोपनियतेच्या दृष्टीने विशेष खबरदारी घेण्यात आली आहे. मतमोजणीच्या वेळी राजकीय कार्यकर्ते, मतमोजणी प्रतिनिधी यांनी शांतता राखून सहकार्य करावे, असे आवाहनही निवडणूक निर्णय अधिकारी सचिन इथापे यांनी केले आहे. मतम ोजणी कक्षात सुरक्षेसाठी पुरेसा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. यामध्ये १२ पोलीस अधिकारी, १२५ पोलीस अंमलदार याशिवाय केंद्रीय सुरक्षा बल, एस.आर.पी.एफ. यांची सुरक्षा राहणार आहे. मतमोजणी केंद्रासह मतमोजणी परिसरात चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. निवडणूक निकालानंतर नागरिकांनी शांतता राखून कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी सहकार्य करावे. असे आवाहन उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.अर्जुन भोसले यांनी केले आहे.

# निवडणूक विषयक कामात कसूर; मराठी उच्च प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापकाविरुद्ध गुन्हा दाखल

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२१, बुलडाणा :** मतदान साहित्य वाटपाच्या वेळी अनुपस्थित राहून कामात कसून केल्या प्रकरणी नांद्राकोळी येथील मराठी उच्च प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापकाविरूद्ध पोलीस स्टेशन, बुलडाणा येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




बुलडाणा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या शिफारसीनुसार तक्रार दाखल केली आहे. निवडणूकविषयक कामकाजासाठी अधिकारी कर्मचाऱ्यांची नेमणूक करुन दि. १९ नोव्हेंबर रोजी मतदानाचे साहित्य वाटपाचे नियोजन करण्यात आले होते. यावेळी मराठी उच्च प्राथमिक शाळा नांद्राकोळी येथील मुख्याध्यापक म तदानाचे साहित्य वाटप होत असलेल्या ठिकाणी मतदान केंद्राचे साहित्य घेण्यास अनुपस्थित होते. ही बाब निवडणूक कामकाजात अडथळा निर्माण केला असून लोकप्रतिनिधी अधिनियम १९५१ चे कलम १३४ अन्वये कर्तव्यात कसूर केला आहे.

त्यानुसार निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या शिफारसीनुसार मुख्याध्यापक यांच्या विरुद्ध पोलीस स्टेशन बुलढाणा येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर बाब जिल्हा परिषदचे जिल्हा सेवा वर्तणूक नियम १९६७ मधील कलम ३ चा भंग केला आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी गटविकास अधिकारी तथा सहायक निवडणूक अधिकारी यांना प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन सदर मुख्यध्यापकास नियम १९६७ मधील कलम ३ तरतूदीनुसार निलंबनाचा आदेश पारित केला आहे. निलंबन कालावधी त्यांचे मुख्यालय मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बुलढाणा यांचे कार्यालयाकडून प्राप्त आदेशाप्रमाणे मुख्यालय राहील, अशी माहिती पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी यांनी प्रसिद्ध पत्रकाव्दारे कळविले आहे.

# जिल्ह्यात सरासरी ६९.६४ टक्के मतदान; मतमोजणीसाठी सज्जता

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२१, छत्रपती संभाजीनगर :** विधानसभा निवडणूक २०२४ करीता जिल्ह्यातील ९ विधानसभा मतदार संघात मिळून एकूण ६९.६४ टक्के मतदान झाले आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी दिलीप स्वामी यांनी गुरुवार, दिनांक २१ नोव्हेंबर २०२४ रोजी पत्रकार परिषदेत दिली. आज आयोजित पत्रकार परिषदेस जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, पोलीस आयुक्त प्रवीण पवार, पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड, उपजिल्हा निवडणूक अधिकारी देवेंद्र कटके उपस्थित होते. मतदान प्रक्रिया आटोपून, सर्व मतदान यंत्रे इ. सहसाहित्य स्ट्रॉंग रुम मध्ये जमा करण्यात आले. हे काम रात्री उशीरापर्यंत सुरु होते. यासंदर्भात आज पत्रकार परिषदेचे आयोजन करुन माध्यमांना माहिती देण्यात आली.




**जिल्ह्यात विधानसभा मतदारसंघनिहाय (सन २०२४ मध्ये) मतदान टक्केवारी याप्रमाणे –**

१०४- सिल्लोड-८०.०८ टक्के, १०५- कन्नड-६९.३१ टक्के, १०६- फुलंब्री-७२.२२ टक्के, १०७-औरंगाबाद मध्य-५९.३५ टक्के, १०८-औरंगाबाद पश्चिम-६०.५८ टक्के, १०९-औरंगाबाद पूर्व-६०.६३ टक्के, ११०- पैठण-७७.५३ टक्के, १११- गंगापूर-७३.७७ टक्के, ११२-वैजापूर-७५,९४ टक्के. असे एकूण सरासरी ६९.६४ टक्के मतदान झाले होते.

जिल्ह्यात एकूण १६ लाख ६३ हजार १८६ पुरुष मतदारांपैकी ११ लाख ७८ हजार ६१७ जणांनी मतदान केले. तर १५ लाख ३९ हजार ४२१ महिला मतदारांपैकी १० लाख ५१ हजार ६७७ महिलांनी मतदान केले. तर इतर मतदारांमध्ये १४४ जणांपैकी ४० जणांनी मतदान केले. एकूण ३२ लाख २ हजार ७५१ मतदारांपैकी २२ लाख ३० हजार ३३४ मतदारांनी मतदान केले. पुरुषांची मतदानाची टक्केवारी ७०.८७ तर महिलांची टक्केवारी ६८.३२ . इतर मतदारांची टक्केवारी २७.७८ टक्के होती. एकूण सरासरी टक्केवारी ६९.६४ टक्के आहे.

**सन २०१९ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणूकीच्या तुलनेत झालेले मतदान याप्रमाणे –**

सन २०१९ मध्ये जिल्ह्यात २८ लाख ५४ हजार २८१ मतदार होते. त्यात १५ लाख ५ हजार २७६ पुरुष, १३ लाख ४८ हजार ९७९ महिला व २६ इतर मतदार होते. त्यावेळी यापैकी १० लाख २४ हजार ६७२ पुरुष, ८ लाख ४९ हजार ७०८ महिला व इतर ५ असे एकूण १८ लाख ७४ हजार ३८५ जणांनी मतदान केले होते. एकूण टक्केवारी ६५.६७ होती.

**सन २०१९ मध्ये मतदार संघनिहाय झालेले मतदान याप्रमाणे –**

१०४- सिल्लोड- २,३६,७३६- ७४.८३ टक्के१०५-कन्नड- २,१४,४००- ६८.२५ टक्के.१०६-फुलंब्री- २,२७,१६४- ६९.६८ टक्के.१०७-औरंगाबाद मध्य- १,९२,८०५- ५९.१९ टक्के.१०८-औरंगाबाद पश्चिम-१,९८,१८२- ५९ टक्के १०९-औरंगाबाद पूर्व- १,९४,३८१- ६०.९ टक्के.११०-पैठण- २,१२,४९५- ७२.३ टक्के.१११-गंगापूर- २,०२,७५२- ६४.७२ टक्के.११२-वैजापूर- १,९५,४७०- ६३.१ टक्के.विधानसभा मतदारसंघनिहाय (सन २०२४) मतदानाची'महिला, पुरुष व इतर' निहाय विगतवारी-१०४-सिल्लोड-पुरुष-१,५०,५८५,महिला-१,३६०९५, इतर-२, एकूण मतदान- २,८६,६८२.१०५- कन्नड-पुरुष-१,२२,५१९,

महिला-१,०८,०९९,इतर-४,एकूण मतदान- २,३०,६२२१०६-

फुलंब्री-पुरुष-१,४१,५२८,

महिला-१,२६,१७६,इतर-२,एकूण मतदान- २,६७,७०६.१०७-औरंगाबाद मध्य-पुरुष-१,१४,९८३,महिला-१,०३,९७८,इतर-५,एकूण मतदान- २,१८,९६६.१०८-औरंगाबादपश्चिम-पुरुष-१,३०,०१७,महिला-१,१६,६०६,इतर-१५,एकूण मतदान- २,४६,६३८.१०९-औरंगाबाद पूर्व-पुरुष-१,१४,१०४,महिला-१,००,९२१,इतर-४,एकूण मतदान- २,१५,०२९.११०-पैठण-पुरुष-१,३३,९६४,महिला-१,१८,२७३,इतर-०,एकूण मतदान- २,५२,२३७.१११-गंगापूर-पुरुष-१,४१,७३०,महिला-१,२७,३३७,इतर-८,एकूण मतदान- २,६९,०७५.११२-वैजापूर-पुरुष-१,२९,१८७,महिला-१,१४,१९२,इतर-०,एकूण मतदान-२,४३,३७९.मतदान केंद्रावरील आरोग्य सेवेचा ९४७९ जणांना लाभप्रत्येक मतदान केंद्रस्थळी आरोग्य सेवांसाठी आरोग्य सेवा केंद्र उपलब्ध करण्यात आल्या होत्या.

या सेवांचा लाभ ८३२४ मतदारांनी घेतला तर ११५५ मतदान कर्मचाऱ्यांनी अशा एकूण ९४७९ जणांनी लाभ घेतला. दरम्यान मतदान प्रक्रियेत ३४ कर्मचाऱ्यांना रुग्णालयात दाखल करावे लागले. त्यापैकी ८ जणांना खाजगी रुग्णालयात तर २६ जणांना शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. मतमोजणीसाठी सज्जताशनिवार दि.२३ रोजी होणाऱ्या मतमोजणीसाठी प्रशासनाची सज्जता झाली आहे. आजच मतमोजणीसाठी लागणाऱ्या कर्मचाऱ्यांचे सरमिसळीकरण करण्यात आले. इव्हीएमसाठी १२६ टेबल असतील.

टपली मतपत्रिकांसाठी ७० टेबल असतील तर ईटीपीबीएस साठी १२ टेबल असतील, अशी माहिती देण्यात आली. ८५२ मतमोजणी कर्मचारी , २४२ सुक्ष्म निरीक्षक व ३००० पोलीस कर्मचारी असे ५७७८ मनुष्यबळ मतमोजणीसाठी नियुक्त करण्यात आले आहे. मतदारसंघ निहाय होणाऱ्या मतमोजणीच्या फेऱ्या या प्रमाणे- सिल्लोड-२९, कन्नड-२७, फुलंब्री-२७, औरंगाबाद मध्य-२३, औरंगाबाद पश्चिम -२८, औरंगाबाद पूर्व-२४, पैठण-२६, गंगापूर-२७, वैजापूर-२६. मतमोजणी कालावधीत व मतमोजणी नंतरही कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न उद्धवू नये म्हणून पुरेसा पोलीस बंदोबस्त, केंद्रीय सुरक्षा बलांच्या तुकड्या तैनात करण्यात आल्या आहेत. संवेदनशील भागात गस्त, ड्रोनद्वारे, सीसीटिव्ही द्वारे गस्त वाढविण्यात आली आहे. सद्यस्थितीत ६ केंद्रीय बल गट तर २ राज्य राखीव पोलीस बल गट जिल्ह्यात तैनात आहेत, अशी माहिती पोलीस आयुक्त प्रविण पवार यांनी दिली.

# थोडक्यात

## पानगावमध्ये ६१ टक्के मतदान

**अक्षराज : उमेश जोशी**

**दि.२०, पानगाव (रेणापुर) :** लातुर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील पानगावमध्ये एकूण ९ मतदान केंद्रे होती. व एकूण ९ हजार ९३९ मतदारापैकी ६०६६ मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. त्यात २ हजार ७९९स्त्रीया तर ३६७ पुरुषांनी मतदान केले. तर ३ हजार ८७३ मतदारांनी मतदानाकडे पाठ फिरवली. पाथरवाडी येथे १०९० पैकी ७८०, चुकारवाडी ३०० पैकी २८१, रामवाडी ५५४ पैकी ३९२, फावडेवाडी १ हजार ३०० पैकी ८९२, नरवटवाडी ४४४ पैकी ३७०, मुसळेवाडी १ हजार २५४ पैकी ८४९ गोविंदनगर ११७४ पैकी ८०६, भंडारवाडी १२०९ पैकी ८२८ मतदान शांततेत पार पडले. पानगावमध्ये सर्व मतदान केंद्रावर वयोवृद्ध व्यक्तींना व्हीलचेअरवर बसून आणुन मतदान करुन घेतले जात होते मग ग्रह मतदान करु घेण्यासाठी निवडणुक आयोगाने नेमुण दिलेले पथक या वयोवृध्द व्यक्ती पर्यंत पोहोचु शकले नाहीत का या पथकातील कर्मचार्यांनी कामचुकारपणा केला. याबाबत मतदान केंद्रावर चर्चा केली जात होती. एकूणच मतदान शांततेत पार पडले. पोलीस निरीक्षक प्रदिप काकडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस बंदोबस्त चोख ठेवण्यात आला होता.

## तृतीय पंथीय मतदारांनी गैरसमजुतीतून टाकला होता मतदानावर बहिष्कार

**अक्षराज : विश्वनाथ शेनोय**

**दि.२०, कल्याण (ठाणे) :** कल्याण पूर्व मतदार संघात पोलीस अधिकारी वर्ग समवेत झालेल्या गैरसमजुतीमधून किन्नर पंथीय सम ुदायाने दिनांक २० नोव्हेंबर २०२४ रोजी विधानसभा निवडणुकीतील मतदानावर बहिष्कार टाकला होता.



तथापि निवडणूक कर्तव्यावरील अधिकारी कर्मचारी, महापालिका अधिकारी यांच्याशी झालेल्या चर्चेअंती सदर प्रकार गैरसमजुतीमुळे घडला असल्याची प्रांजल कबुली किन्नर समुदायाच्या जिल्हा आयकॉन नीता केणे यांनी दिली. नीता केणे यांचे समवेत अनेक किन्नर पंथीय मतदारांनी आपली बहिष्काराची भूमिका मागे घेत मतदान केले.

पोलीस अधिकाऱ्यांबरोबर झालेल्या गैरसमजुतीतून हा प्रकार घडला असून किन्नरांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सगळ्यांच्या सहकार्याची आवश्यकता आहे. आज सगळ्यांच्या सहकार्यामुळेच आम्हाला मुख्य प्रवाहात आणले जाईल असा आशावाद नीता केणे यांनी यावेळी बोलताना व्यक्त केला. किन्नर पंथीय मतदारांची गैर समजूत दूर करून त्यांस मतदानास प्रवृत्त करण्यासाठी यांच्या मार्गदर्शनाखाली १४२-विधानसभा मतदान संघाचे केंद्रीय निवडणूक निरीक्षक अमित शर्मा, अप्पर पोलीस आयुक्त ठाणे संजय जाधव, निवडणूक निर्णय अधिकारी रमेश मिसाळ, परिमंडळ- ०३ चे पोलीस उपायुक्त अतुल झेंडे, महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड, स्वीपचे जिल्हा नोडल अधिकारी संजय जाधव तेथील वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांनी मोलाची भूमिका बजावली. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी ठाणे अशोक शिनगारे व कल्याण डोंबिवली महानगरपालिका आयुक्त डॉ. इंदु राणी जाखड हे देखील सदर प्रकरणी वेळोवेळी मार्गदर्शन करीत होते.

## डोंबिवली विधानसभा मतदारसंघासाठी मतमोजणी निरीक्षक म्हणून अम्रिता सिंह यांची नियुक्ती

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२१, डोंबिवली (ठाणे) :** महाराष्ट्र विधानसभा निवडणूक-२०२४ साठी केंद्रिय निवडणूक निर्वाचन आयोगाने १४३ डोंबिवली या विधानसभा मतदारसंघांसाठी मतमोजणी निरीक्षक म्हणून अम्रिता सिंह (एस.सी.एस) यांची नियुक्ती केलेली आहे. १४३ डोंबिवली विधानसभा मतदारसंघातील उमेदवारांच्या/ नागरिकांच्या मतम ोजणी विषयक काही तक्रारी असल्यास तक्रारदार हे दि.२२ नोव्हेंबर २०२४ पासून लेपेलीशऔंशअॅ१४३सारळश्र.लो या ई-मेल आयडीवर तक्रार करु शकतात अथवा ९१३७३३५६०४ या दुरध्वनी क्रमांकावर संपर्क करू शकता. अम्रिता सिंह (एस. सी.एस) यांचे संपर्क ठिकाण: बंगलो नंबर ५, सेंच्युरी रेयॉन कॉलनी, ए-टाईप, कल्याण मुरबाड रोड, शहाड, जिल्हा ठाणे या ठिकाणी सकाळी १०.०० ते ११.०० या वेळेत प्रत्यक्ष भेटून तक्रार करु शकतात, याची नोंद घ्यावी, असे आवाहन १४३ डोंबिवली विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी अमित शेडगे यांनी केले आहे.

## गुडसुरमध्ये मतदान शांततेत; १३ उमेदवाराचे भवितव्य मतपेटीत बंद

**अक्षराजः जयराम देमगुंडे**

**दि.२०, उदगीर (लातुर) :** उदगीर जळकोट विधानसभा अजा २३७ राखीव मतदार संघात बुधवार, दिनांक २० नोव्हेंबर रोजी सकाळी ७ वाजता पासुन ते ६ वाजेपर्यंत म



तदारांनी आपापल्या पक्षाचे कार्यकर्ते नेत्यांनी मतदान केले गुडसुर मध्ये एकूण ४ बुथ केंद्रावर एकूण ४ हजार ४२५ मतदार स्त्री पुरुषां पैकी २ हजार ८७७ स्त्री पुरुषांनी म तदानाचा हक्क बजावला एकूण ६५ टक्के मतदान झाले. अशा पद्धतीने मतदान शांततेत पार पडले खरी लढत नामदार संजय बनसोडे यांच्या घडी विरुद्ध सुधाकर भालेराव यांच्या तुतारीत लढत झाली.

बनसोडे यांचे नियोजन बद्ध प्रचार व कार्यकर्ते तसेच भाजपा, शिंदे शिवसेना व अजितदादा पवार राष्ट्रवादी महायुती पक्षाचे कार्यकर्ते मेहनत घेताना दिसत होते. तर महाविकास आघाडी मित्र पक्षाचे कॉंग्रेस, उबाठा, शरदचंद्र पवार राष्ट्रवादी कांग्रेसचे कार्यकर्ते देखील मेहनत घेतले गुडसुर मध्ये उमेदवार मात्र गुडसुर मतदान केंद्रावर आले नाहीत. मतदान खेळीमेळीच्या वातावरणात शांततेत पार पडली. यावेळी बी.एल ओ श्रीपात पाटील, मुंडे एस.पी.फड, काबळे बी.ए. तलाठी गुंडरे यांनी चोख कार्य केले.